ASSOCIATION OF THE MANAGEMENTS
OF POLYTECHNICS (MAH.)
06 DEC 2013
Inward No. 143
File No.
Initial ... Bhoye

**महाराष्ट्र शासन**

क्र. टीईएम-२०१३/(प्र.क्र.३३३)/तांशि-४,
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मंत्रालय** विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०१३

प्रति,

१) अध्यक्ष, असोसिएशनऑफ दि मॅनेजमेंटस ऑफ अनएडेड इंजिनिअरींग कॉलेजेस (महाराष्ट्र), हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक-४२२ ००३.
२) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
३) अपर मुख्य सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
६) कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क समिती, शासकीय तंत्र निकेतन परिसर, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
७) कुलगुरु, सर्व विद्यापीठे
८) कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हांपूर
९) सह सचिव (म.शि.), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) सह सचिव (वि.शि.), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
११) संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.
१२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई
१४) अवर सचिव (तांशि-३/तांशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) कक्ष अधिकारी (तांशि-२), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

विषय : असोसिएशन ऑफ द मॅनेजमेंटस ऑफ अनएडेड इंजिनिअरींग कॉलेजेस (महाराष्ट्र) यांच्या विविध समस्यांबाबत मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८ ऑक्टोबर, २०१३ रोजी जवाहरलाल नेहरु कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचा कार्यवृतांत

महोदय,

उपरोक्त विषयावर मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८ ऑक्टोबर, २०१३ रोजी जवाहरलाल नेहरु कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांताची प्रत पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

आपला,

(म. मा. मोरवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :

१) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव .
२) प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहायक,

असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंटस् ऑफ अन एडेड इंजिनिइरींग कॉलेजस् (महाराष्ट्र) यांच्या विविध समस्यांबाबत मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दिनांक १८ऑक्टोबर,२०१३ रोजी जवाहरलाल नेहरु कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत

सदर बैठकीस खालील अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते :-

१. डॉ.अभय वाघ, उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२. श्री .एम.एम. आत्राम, सहआयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य , पुणे
३. डॉ. एस. के. महाजन,संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. डॉ. पी. एम.खोडके, संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई
५. श्री. एम.डी. शिवणकर,सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद
६. डॉ. एस.एस. निकाळजे, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (प्रतिनिधी)
७. श्री. एम.एम. मोरवे, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
८. श्रीमती के.व्ही.साने, प्रवेश नियंत्रण /शिक्षण शुल्क समिती, मुंबई
९. श्री. बाळासाहेब वाघ, अध्यक्ष, असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ अन-एडेड इंजिनिअरींग कॉलेजस् (महाराष्ट्र)
१०. श्री. कमलकिशोर कदम, अध्यक्ष, महात्मा गांधी मिशन संस्था
११. श्री. ए.एन.कदम, सचिव,जवाहरलाल नेहरु इंजि. कॉलेज, औरंगाबाद
१२. डॉ. ई.बी. खेडकर, कार्यकारी अध्यक्ष,असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ एमबीए एमएमएस
१३. श्री.पी.व्ही.पागे (C.A.) मुंबई
१४. श्री. प्रताप बोराडे, विश्वस्त, महात्मा गांधी मिशन संस्था
१५. श्री. एस. बी. कोलते, कार्यकारी अध्यक्ष, मॅनेजमेंट असोसिएशन ऑफ एमसीए इन्स्टिटयूट
१६. डॉ. एस.ए.हालकुडे, प्राचार्य, सोलापुर
१७. श्रीमती निलीमा पवार, जनरल सेक्रेटरी, नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज

सर्व मान्यवरांचे स्वागत करुन सकाळी ११-३० वा. बैठकीला सुरुवात झाली. प्रथमत: डॉ. हालकुडे यांनी फेडरेशन व इंजिनिअरींग, एमबीए, एमसीए, एचएमसीटी, पॉलीटेक्नीक्स, बीएड इ. असोसिएशन यांचे समोरील विविध विषय व तत्संबंधित विविध अपेक्षांवर पॉवर पॉईंटद्वारे प्रेझेंटेशन केले. यामध्ये मुख्यत्वे खालील विषय समाविष्ट होते :-

१. राज्यातील खाजगी संस्थामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा,प्रवेश प्रक्रिया व शैक्षणिक शुल्काबाबत सर्वंकष कायदा करण्याबाबत
२. व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना वाढीव शिक्षण शुल्क आकारणीबाबत
३. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये प्रथम वर्षात व थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाच्या सवलतीबाबत
४. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणा-या शिक्षण शुल्क प्रतिपुर्तीबाबत
५. महाराष्ट्रात टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीची स्थापना करणेबाबत
६. राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या ३५% व त्यापेक्षा अधिक रिक्त राहणा-या जागांच्या अनुषंगाने संबंधित संस्थांचा दर्जा व गुणवत्तेवर होणारा परिणाम
७. UGC च्या पत्राची (पत्र क्र.D.O.No.१४९/२०१३(CPP-II)dtd.२७ May २०१३) नोंद घेणे व त्यावर पुढील कार्यवाही करणेबाबत
८. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या नियामक मंडळात प्रत्येक असोसिएशनच्या पदाधिका-याचा समावेश होणेबाबत
९. प्रथम वर्ष प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांची माहिती सर्व संबंधित विभागांना सॉफ्टकॉपी मध्ये पुरविणेबाबत
१०. शिक्षण शुल्क समिती ही फी निश्चित करतेवेळी मंजूर प्रवेशक्षमता (सर्व वर्ष) ही Divisor factor म्हणून घरली जाते. त्याऐवजी Actial Admission झालेल्या संख्येइतकी Diviosor factor धरणेबाबत
११. इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत पूर्वीप्रमाणे परीक्षा पध्दत लागू करणेबाबत
१२. इंजिनिअरींग असोसिएशन समोरील विषय
१३. पॉलिटेक्निकस् असोसिएशन समोरील विषय
१४. बी.एड असोसिएशन समोरील विषय
१५. एम.बी.ए. असोसिएशन समोरील विषय
१६. एम.सी.ए. असोसिएशन समोरील विषय
१७. हॉटेल मॅनेजमेंट असोसिएशन समोरील विषय

फेडरेशनच्या पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन नंतर डॉ.अभय वाघ, उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी विविध प्रश्नावर शासनाची भूमिका विशद केली. राज्यातील खाजगी संस्थामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश व शैक्षणिक शुल्काबाबत प्रवेश नियंत्रण समिती व शिक्षण शुल्क समिती सद्य:स्थितीत अस्तित्वात व कार्यरत आहे. परंतू या संदर्भात सर्वंकष कायदा करण्याची आवश्यकता असून त्यादृष्टीने शासनस्तरावर प्रयत्न सुरु आहेत. तसेच राज्यात टेक्निकल युनिव्हर्सिटीची आवश्यकता असल्याबाबत मा. मंत्री महोदय सुरुवातीसूनच आग्रही आहेत असे डॉ. वाघ यांनी सांगितले.

त्यासअनुसरून मा. मंत्री महोदय यांनी सूचित केले की, मा. सर्वोच्च न्यायालयाने प्रवेश नियंत्रण तसेच शिक्षण शुल्क समितींची स्थापना करण्याचे आदेश दिलेले आहेत यानुसार राज्यस्तरावर कायदा करण्यात येणार असून याचा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळात मांडण्यात येईल. टेक्निकल युनिर्व्हसिटी व एक्सटेंशन सेंटर बाबत लवकरच मा. मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन मंत्रिमंडळात प्रस्ताव मांडण्यात येईल व लवकरच योग्य तो निर्णय घेण्यात येणार आहे.

डॉ. एस.के.महाजन, संचालक,तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील इंजिनिअरींगच्या तसेच एमबीए च्या ३५ ते ४० टक्के जागा रिक्त असल्याबाबत माहिती देऊन शिक्षणाचा दर्जा खालावत आहे याबाबत खेद व्यक्त केला. ग्रामीण व शहरी भागातील ९२ संस्थांची तपासणी करण्यात आली असून सदर संस्थापैकी ब-याच संस्था गेल्या ५ - ६ वर्षापासून सुरु आहेत. तेथे इनफ्रास्ट्रक्चरच्या उणिवा, ग्रामीण भागातील कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याकरीता विद्यार्थ्यांमध्ये असलेली अनास्था, टिचिंग स्टाफची कमतरता व वाढीव प्रवेश क्षमता यामुळे रिक्त जागांची कारणमिमांसा विशद केली. तसेच ज्या अभ्यासक्रमांना विद्यार्थी पसंती देत नाही अशा अभ्यासक्रमाची कांही कालावधीकरीता प्रवेश क्षमता कमी करणे किंवा तात्पुरते बंद करणे व गरज भासल्यास कालांतराने ते सुरु करण्यात यावेत असे मत मांडले. त्याचप्रमाणे रिक्त जागांबाबत गठित केलेल्या तज्ञ समितीचा अहवाल १५ नोव्हेंबर अखेर शासनास सादर करण्यात येईल असे डॉ.महाजन यांनी सांगितले.

प्रस्तुत विषयाबाबत डॉ. हेमंत अभ्यंकर, प्राचार्य, यांनी इंजिनिअरींग व पॉलिटेक्नीकच्या जागा रिक्त न राहण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना सुचवल्या. :-

१. अभियांत्रिकीमध्ये प्रवेश घेण्याकरीता साधारणत: ५० हजार ते १,२०,००० फी ची प्रतिपूर्ती करावी लागते. बँकेकडून शैक्षणिक कर्ज घेण्याची सुविधा उपलब्ध आहे परंतू बँकेचा जास्त व्याज दर असल्यामुळे विद्यार्थ्यास कर्ज परवडत नाही. परंतू कमी दराने कर्ज दिल्यास व शासनाच्या वतीने इतर खर्चाकरीता बिनव्याजी कर्ज दिल्यास विद्यार्थी प्रवेश घेऊ शकेल व रिक्त जागा राहणार नाहीत.

२. नवीन संस्थाची स्थापना करताना इनफ्रास्ट्रक्चर करीता बँकाकडून कर्ज घ्यावे लागते परंतू परतावा होत नसल्यामुळे बँका कर्ज देत नाहीत. परंतू शासनाने जागतिक बँकेकडून १५ वर्षाच्या कालावधीकरीता सॉफ्ट लोन देऊन मदत केल्यास इनफ्रास्ट्रक्चरचा प्रश्न सुटेल.

३. शिक्षणाचा दर्जा उंचावण्याकरीता क्वालिफाईड अधिव्याख्यात्यांची आवश्यकता असते. एआयसीटीई ने सर्व संस्थांना पोस्ट ग्रॅज्यूएटचे कोर्स सुरु करण्याची परवानगी दिली आहे. समर क्लास सुरु करण्यात यावेत व अधिव्याख्यात्यांना ट्रेनिंगकरीता तीन-तीन महिने पाठविण्यात यावे. एआयसीटीईकडून कमवा आणि शिका ही योजना लागू केल्यास फायदा होईल.

डॉ. एस.एस. निकाळजे, उच्च शिक्षण पुणे यांनी बी.एड ॲडमिशनबाबत माहिती देताना सांगितले की, बी.एड च्या जवळपास ३५ ते ४० टक्के जागा रिक्त आहेत. ऑपशन्स बेस मुळे विद्यार्थी प्रवेश मिळून सुध्दा प्रवेश घेत नाहीत. दुसरी सीईटी घेऊन बॅच सुरु करावी असे मत व्यक्त

केले. रिक्त जागांकरीता नियमामध्ये व कायदयामध्ये बदल करण्यात यावा, ज्यामुळे रिक्त जागा भरता येतील.

डॉ. पी. एम.खोडके, संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी एमएसबीटीई बाबत बोलतांना सांगितले की, डिप्लोमा अभ्यासक्रमाची वाढती संख्या पाहता मंडळाचे सध्या असलेल्या विभागीय कार्यालयावर कामाचा ताण वाढलेला आहे. त्यामुळे अमरावती व नाशिक येथे नवीन दोन विभागीय केंद्रे येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याची आवश्यकता आहे व त्यादृष्टीने आवश्यक प्रयत्न सुरु आहेत. पुढच्या शैक्षणिक वर्षापासून नवीन विभागीय कार्यालये सुरु करण्याचे निर्णय लवकरच घेण्यात येईल असे मा. मंत्री महोदय यांनी सांगितले.

श्री.एस.बी. कोलते,कार्यकारी अध्यक्ष मॅनेजमेंट असोसिएशन ऑफ एमसीए इन्स्टिटयूट यांनी एमसीए थेट द्वितीय वर्ष प्रवेशामुळे प्रथम वर्षाच्या ९० टक्के जागा रिक्त आहेत. एमसीए हा अभ्यासक्रम दोन वर्षाचा आहे किंवा तीन वर्षाचा आहे यावर शासनाने लवकरच निर्णय घ्यावा, हा अभ्यासक्रम पुर्ण होण्याकरीता विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळत नसल्यामुळे सीईटी जानेवारी किंवा फेब्रूवारीमध्ये घेण्यात यावी. पुर्ण महाराष्ट्र राज्यात एमसीए चे नॉर्म्स सारखेच असावेत. असे प्रतिपादन केले.

डॉ. ई.बी. खेडकर, कार्यकारी अध्यक्ष,असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ एमबीए यांनी एमबीए प्रवेशातील समस्यांचा उहापोह करतांना सांगितले की, एमबीए ची सीईटी जानेवारी किंवा फेब्रूवारीमध्ये घेण्यात यावी. पूर्ण महाराष्ट्र राज्यात एमबीए चे नॉर्म्स सारखेच असावेत त्यामुळे एकवाक्यता होऊ शकेल. महाराष्ट्रात अभ्यासक्रम सारखाच ठेवावा म्हणजे विद्यार्थी कोठेही अँडमिशन घेण्यास इच्छुक राहतील. असोसिएशनतर्फे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यासदेखील स्कॉलरशिप सवलत मिळावी, ग्रामीण भागात पदवी कॉलेज काढावेत, पीएच.डी. अध्यापक मिळत नसल्यामुळे एआयसीटीईच्या नॉर्म्समध्ये आवश्यक ते बदल किंवा शिथील करणे तसेच खाजगी कंपनीतील तज्ञ लोकांना शिकविण्याकीरता बोलाविण्यांस परवानगी दयावी, एमबीए करुन सुध्दा कंपन्या प्लेसमेंट बाबत नकार देतात किंवा कमी पगारावर नोकरी देतात. यावर मा. मंत्री महोदयांनी एमबीए अभ्यासक्रमासाठी प्राध्यापक,सहयोगी प्राध्यापक इ. पदासाठी पीच.डी पात्रतेऐवजी उद्योगक्षेत्रातील मुबलक अनुभव समकक्ष समजण्यात यावा, यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता नमूद केली.

श्री. एम.एम. आत्राम, सहआयुक्त, समाज कल्याण यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याकरीता अस्तित्वात असलेल्या विविध स्कॉलरशिपबाबत माहिती देताना सांगितले की, शासनाने स्कॉलरशिप योजना ऑन लाईन केलेली आहे. त्यामुळे राज्य शासनाला भारत सरकारकडून ई - इंडिया पुरस्कार मिळाला आहे. संस्थेने स्कॉलरशिपचा फॉर्म दाखल केल्यानंतर एक महिन्याच्या आत स्कॉलरशिप देण्यात येईल. चालू महिन्याच्या शेवटी अर्ज पाठविल्यास विशेष मोहिम राबवून नोव्हेंबर महिन्यामध्ये स्कॉलरशिप दिली जाईल असे सांगितले. अँडमिशन प्रक्रियेच्या वेळेसच स्कॉलरशिप करीता ई-लिंक देण्यात आल्यास मागासवर्गीय विद्यार्थ्यास स्कॉलरशिप मिळणे सोपे जाईल. ज्या विद्यार्थ्यास स्कॉलरशिप मंजूर झाली त्या

विद्यार्थ्यांने परीक्षा देणे बंधनकारक राहिल असे प्रतिपादन केले. शिक्षण शुल्क समितीने शैक्षणिक शुल्क लवकरात लवकर निश्चित केल्यास स्कॉलरशिप बजेटमध्ये प्रस्ताव सादर करुन स्कॉलरशिप लवकर मंजूर करणे शक्य होईल असे सांगितले.

श्री.भिरुड, एआयसीटीई अॅडव्हायझर यांनी एआयसीटीई बाबत माहिती देताना सांगितले की, एआयसीटीई संकेतस्थळावर संस्था जी माहिती भरतात त्या अनुषंगाने एआयसीटीई प्रवेश क्षमता कमी किंवा वाढवून देते. रिक्त जागेचा प्रश्न शालेय शिक्षण, माध्यमिक व उच्च शिक्षण आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्याशी चर्चा करुन सोडवता येईल. एमबीए व एमसीए हे अभ्याक्रम टेक्निकल एज्यूकेशन अंतर्गत येत नाहीत असा सुप्रिम कोर्टाचा निकाल असल्याचे निदर्शनास आणून दिले. सध्या यूजीसी एमबीए व एमसीए या अभ्यासक्रमाचे नियमन पाहील असे नमूद केले. तसेच भारतीय शिक्षण पध्दती केंद्र आणि राज्य शासन यांची मिळून तयार झालेली आहे. बरेच निर्णय केंद्र शासन घेते मात्र विद्यापीठाने मान्यता दिल्याशिवाय अभ्यासक्रम सुरु करता येत नाहीत. बारावीनंतर पाच वर्षाचा डयूएल पदवी अभ्यासक्रम सुरु करावा. ज्यामध्ये तीन वर्ष बीसीए/बीबीए व दोन वर्ष एमबीए/एमसीए असेल, त्याचा पाठपुरावा करण्यात यावा. क्वालिफाईड टिचर, एआयसीटीई नॉर्म्सप्रमाणे उपलब्ध होत नसेल तर पार्ट टाईम लेक्चरर म्हणून बी.ई झालेल्या उमेदवारास संधी देण्यात यावी, असेही त्यांनी नमूद केले.

टी एफ डब्ल्यू एस प्रकारात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शाखा बदल, संस्था बदलास परवानगी देण्यासंदर्भात डॉ.एस के महाजन , संचालक, तंत्रशिक्षण यांनी अशा प्रकारात प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना शाखा बदल किंवा संस्था बदल करण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक नियमावलीमध्ये तरतूद नसल्यामुळे तसे करता येणार नाही असे स्पष्ट केले. तसेच एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी इतर सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा संपन्न झाल्यानंतर सर्वात शेवटी एचएमसीटी सीईटी घेण्यात येते असे स्पष्ट केले. तसेच सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना सीईटी अनिवार्य करण्याचे धोरण असल्यामुळे केवळ एचएमसीटी अभ्यासक्रमासाठी सीईटी रद्द करता येणार नाही असेही डॉ.महाजन यांनी स्पष्ट केले.

श्री. कमलकिशोर कदम, अध्यक्ष, महात्मा गांधी मिशन संस्था यांनी असे सांगितले की, खाजगी संस्थेला स्वायतता दयावी शिक्षणाचे राष्ट्रीयकरण करु नये, जी संस्था शासनाकडून अनुदान घेत नाही त्या संस्थेची प्रवेश प्रक्रिया शासन राबवू शकत नाही. शासनाने प्रवेश नियमाप्रमाणे होत आहेत की नाही हे पहावे. तसेच फी ची निश्चिती शिक्षण शुल्क समिती करते. फी ठरविण्याचा अधिकार संस्थेला आहे. सरकारने याबाबतीत ठरवलेली फी ही कॅपिटेशन फी नसावी एवढेच पहावे. शासनाने शासकीय संस्थेत एका विद्यार्थ्यावर किती खर्च होतो ते पाहून खाजगी संस्थांनी किती शुल्क आकारावे हे ठरवावे. खाजगी संस्थांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवावे. कार्यकारी मंडळातील शासनाने त्यांचे प्रतिनिधी मागे घ्यावेत. नियुक्ती करताना शासनाने नियमाप्रमाणे नियुक्ती होत आहे का, एवढेच पहावे असे मत व्यक्त केले.

श्री. बाळासाहेब वाघ, अध्यक्ष,इंजिनिअरींग अँड पॉलिटेक्निक असोसिएशन यांनी आपले खालीलप्रमाणे मुद्दे मांडले :

१. विद्यार्थ्यांच्या विविध स्कॉलरशिपकरीता उत्पन्न मर्यादा वेगवेगळी आहे. उदा. ईबीसी करीता उत्पन्नाची मर्यादा रु. १ लाख, अल्पसंख्याकाकरीता उत्पन्नाची मर्यादा रु. २.५ लाख व नॉन क्रिमीलेअर करीता ४.५० लाख. अशी वेगवेगळी उत्पन्न मर्यादा न ठेवता सर्वाकरीता सरसकट रुपये ४.५० लाख अशी उत्पन्न मर्यादा करण्यात यावी.

२. शिक्षण संस्थांना इमारत बांधकामाकरीता एफएसआय वाढवून दयावा जेणेकरुन एआयसीटीईच्या मानकाप्रमाणे इन्फ्रास्ट्रक्चरची पुर्तता करता येईल.

३. एआयसीटीईच्या मानकाप्रमाणे प्राचार्य किंवा विभागप्रमुख यांची शैक्षणिक अर्हता पीचडी पाहिजे परंतू पीएचडी असलेले उमेदवार आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध होत नाहीत. तसेच व्हिजिटिंग प्रोफेसर घेण्यास एआयसीटीईने परवानगी दयावी अशी मागणी केली.

४. नॅनो टेक्नॉलॉजी सारख्या नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी दयावी.

५. बी एड कॉलेजमध्ये ॲडमिशन घेऊन तासिका न करता थेट परीक्षेलाच विद्यार्थी येतात त्यांना उपस्थिती अनिवार्य करावी.

६. बी. एड.अभ्यासक्रमाचा कालावधी २०० दिवसांचा आहे. अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष ऑक्टोबरपासून सुरु होते. त्यामुळे आवश्यक असलेला कालावधी पूर्ण होत नाही. अभ्यासक्रम पूर्ण होण्याकरीता काही उपाययोजना आखता येतात का ते पहावे.

७. राष्ट्रीय पातळीवर JEE (सामायिक प्रवेश परीक्षे) सोबतच राज्य पातळीवर सीईटी घेण्यात यावी. जेणेकरुन राज्यस्तरावरील १२ वी अभ्यासक्रमाच्या शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश घेतांना न्याय मिळू शकेल.

८. सध्या १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्याना परीक्षा न घेताच उत्तीर्ण केले जाते. तसे न करता जुनी पध्दत अवलंबावी त्यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावेल.

९. ॲग्रीकल्चर कॉलेजच्या मुलीकरीता राज्यशासनाकडून वसतिगृह फी सवलत देण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर व्यावसायिंक अभ्यासक्रमात शिक्षण घेणा-या मुलींच्या वसतिगृहाची फी सवलत देण्यात यावी.

१०. नजिकच्या भविष्य काळात शैक्षणिक क्षेत्रात परदेशी विद्यापीठे उच्च दर्जाचे शिक्षण देण्याकरीता भारतात प्रवेश करणार आहेत. त्यासाठी उच्च दर्जाचे शिक्षण देण्याच्या उद्देशाने टेक्नॉलॉजिकल युनिर्व्हसिटी स्थापन करण्याबाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन निर्णय घेण्यात यावा.

उपस्थित सदस्यांनी मांडलेले विचार व चर्चा केलेल्या सर्व मुद्दयांवर उत्तर देतांना मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांनी आपली भूमिका स्पष्ट करुन शासनाचा सकारात्मक दृष्टीकोन असल्याचे नमूद केले. व सर्व समस्यांचा गोषवारा समोर ठेऊनच निर्णय घेतले जातील अशी ग्वाही दिली. शासनाची भुमिका Facilitater तसेच Enabler ची राहिल असे नमूद करून असोसिएशनने मांडलेल्या विविध शैक्षणिक अडचणी ज्या शक्य आहे त्या अडचणी मी निश्चितपणे सोडविण्याचे त्यांनी आश्वासन देताना त्यांची भूमिका विस्तृतपणे खालीलप्रमाणे मांडली :-

१. राज्यातील खाजगी संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमता, प्रवेश प्रक्रिया याबात सर्वंकष कायदा आणण्याविषयी प्रयत्न सुरु आहेत. श्री. कमलकिशोर कदम यांनी मांडलेल्या मतासंदर्भातसुद्धा पुनश्च: विचार करुन त्यात खाजगी संस्थाचालकांच्या प्रतिनिधींचे नियोजित कायद्यामध्ये प्रतिनिधीत्त्व असण्याच्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येतील व त्याबाबत तंत्र शिक्षण संचालनालयाकडून सुधारीत प्रस्ताव मागविण्यात येईल.

२. शैक्षणिक वर्ष २००९-१० साठी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार पुढील शैक्षणिक वर्षासाठीही शिक्षण शुल्कात वाढीव शिक्षण शुल्क आकारणी करण्याबाबत शासन स्तरावरून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक १२.३.२०१३ रोजी पत्र निर्गमित केले आहे.

३. इयत्ता १२ वी नंतर प्रथम वर्षात प्रवेश घेणारे विद्यार्थी चार वर्षामध्ये अभ्यासक्रम पूर्ण केला नाही तर पाचव्या वर्षी तो विद्यार्थी ज्या वर्गात प्रवेश घेईल त्या वेळेस त्याची फी ही शिक्षण शुल्क समितीने शैक्षणिक वर्ष २०१३-१४ प्रथम वर्षासाठी जी फी निश्चित केली जाईल ती फी आकारण्यात यावी. याबाबत असोसिएशनने शिक्षण शुल्क समितीकडे व तंत्र शिक्षण संचालनालयाकडे प्रस्ताव सादर करावा. समितीच्या व तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अभिप्रायानुसार आवश्यक ती कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येईल.

४. डेव्हलपमेंट शुल्काबाबत शासनस्तरावरून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे पाठपुरावा करण्यास विभागास सूचना देण्यात येतील.

५. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ज्या संस्थांबाबत राज्य शासनाची नकारात्मक शिफारस आहे, अशा संस्थांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीची योजना लागू असणार नाही हा निर्णय हा राज्यशासनाने घेतलेला निर्णय असून त्याविरूध्द मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल झालेली आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने याबाबत निर्णय न्यायालयाच्या आदेशानुसार होईल.

६. शासनाच्या शुल्क व प्रवेशाबाबतच्या भुमिकेवर सुप्रिम कोर्टाचे आदेश आहेत त्याचा सन्मान करावा लागेल. मात्र शासनाने खाजगी संस्थांना स्वातंत्र्य देऊन संस्थेवर मर्यादित नियंत्रण ठेवावे या मागणीचा विचार करुन सकारात्मक निर्णय घेण्यासाठी संबंधित शासकीय विभागांचे अभिप्राय घेण्यात येतील.

७. JEE परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतू आपल्या मागणीप्रमाणे महाराष्ट्र सीईटी घेण्याच्या दृष्टीकोनातून तंत्र शिक्षण संचालनालयाकडून अभिप्राय घेऊन आवश्यकतेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

८. प्रवेश प्रक्रियेच्या वेळेस फी, ईबीसी व स्कॉलरशिपकरीता संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याकडून लिंक उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल. ज्यामुळे विद्यार्थ्यांना कागदपत्रे पुन:पुन्हा सादर करण्याची

आवश्यकता राहणार नाही जेणेकरून विद्यार्थ्यांना फी, ईबीसी व स्कॉलरशिप वेळेवर मिळण्यास मदत होईल.तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशाच्यावेळी शुल्क आकारू नये असे मा.मंत्रीमहोदयांनी सूचित केले. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या शिष्यवृत्ती वेळेत अदा करण्याच्या दृष्टीकोनातून वित्त विभाग , समाजकल्याण विभाग यांचेशी बैठक आयोजित करण्यात येईल. तसेच प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रवेशित विद्यार्थ्यांच्या माहितीची सॉफ्ट कॉपी उपलब्ध करून देण्याबाबत विभागाशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल असे सांगितले.

९. शिक्षण शुल्क समितीकडून शिक्षण शुल्क लवकर ठरविण्यात येत नाही. त्याबाबत समाज कल्याण विभाग, वित्त विभाग व उच्च व तंत्रशिक्षण विभाग इ.नी एकत्रित बसून वेळेत प्लॅनिंग करुन बजेट तयार करण्याबाबत संबंधित विभागांकडून अभिप्राय घेऊन व तदनंतर शिक्षण शुल्क निश्चित करण्याची कार्यवाही करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील.

१०. शिक्षण शुल्क मंजूर प्रवेश क्षमतेवर निश्चित न करता प्रत्यक्ष झालेल्या प्रवेशाच्या संख्येवर निर्धारीत करण्याबाबत असोसिएशनने शिक्षण शुल्क समितीकडे प्रस्ताव सादर करावा.

११. जसपाल कमिटीच्या अहवालानुसार Isolated युनिव्हर्सिटी नसावी, असे नमूद केले आहे. मा. मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करुन लवकरच टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी बाबत निर्णय घेण्यात येईल. कर्नाटक राज्यातील विश्वेश्वरय्या टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सिटी,बेळगाव येथे प्रत्यक्ष भेट दिली असता तेथील मॉडेलचा पुर्णपणे अभ्यास केला व तेथील कार्यपध्दती अत्यंत परिणामकारक असून आपल्या राज्यात देखील अशाच पध्दतीचे विद्यापीठ स्थापन व्हावे असे मंत्री महोदय यांनी मत व्यक्त करून याबाबत JBVC मध्ये चर्चा झालेली असून विद्यापीठ स्थापनेविषयी निर्णय लवकरच होईल असे सांगितले.

१२. सध्या सर्व विद्यापीठात अभ्यासक्रम एकसारखा नसल्यामुळे विद्यार्थ्यास नोकरीकरीता अडचणी निर्माण होत आहेत. टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सिटी निर्माण झाल्यास सर्वत्र एकच अभ्यासक्रम राहिल, त्यामुळे एकसुत्रता येईल.

१३. नॅनो टेक्नॉलॉजीसारखे अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत विचार केला जाईल.

१४. ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत होत नाही अशा विद्यार्थ्यांना फी सवलत देता येत नाही, मात्र अशा प्रकरणी सकारात्मक कार्यवाहीच्या दृष्टीने मा. मुख्यमंत्री यांचेशी चर्चा करण्यात येईल.

१५. शिष्यवृत्तीसाठी लाभधारक विद्यार्थ्यांना ९०% प्रतिपुर्ती डिसेंबरपर्यंत देण्यासाठी संबंधित विभागास शासनस्तरावरून सूचित करण्यात येईल .

१६. श्री. बाळासाहेब वाघ यांची स्कॉलरशिपच्या उत्पन्न मर्यादेची मागणी रास्त आहे. सद्यःस्थितीत असलेली ईबीसी करीता उत्पन्नाची मर्यादा रु. १ लाख,

अल्पसंख्याकाकरीता उत्पन्नाची मर्यादा रु. २.५ लाख व नॉन क्रिमीलेअरकरीता उत्पन्नाची मर्यादा ४.५० लाख उत्पन्नाची मर्यादा वेगवेगळी न ठेवता सर्वांसाठी ४.५० लाख असावी याबाबतीत संबंधित विभागांकडून अभिप्राय घेण्यात येऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

१७. रिक्त जागांसंबंधी समिती गठित करुन अहवाल आल्यावर योग्य तो निर्णय घेऊ. तसेच महाराष्ट्रात अनुदानीत ज्युनियर कॉलेजची संख्या वाढविण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून शालेय शिक्षण विभागास सूचित करण्यात येईल. तसेच नवीन महाविद्यालयीन अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत शासनाने बृहत आराखडा तयार करण्यात आलेला असून त्यास कॅबिनेट ने मंजूरी दिलेली आहे तो आराखडा एआयसीटीई ने स्विकारावा.

१८. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून देण्याबाबतचा शासन निर्णय अस्तित्वात आहे. तसेच कॅनरा बँक , ही नोडल बँक म्हणून घोषित करण्यात आलेली आहे. कर्जावरील व्याज पहिले सहा वर्ष शासनाकडून भरणा केले जाते मात्र परिणामकारक अंमलबजावणी बँकेकडून होत नसल्याचे मत व्यक्त केले.

१९. पदविका स्तरावरील अधिव्याख्यांत्यांच्या प्रशिक्षणासाठी टेक्निकल टिचर ट्रेनिंग इन्स्टिटयूट, पुणे येथे एमएसबीटीई यांच्या सहाय्याने सुरु करण्यात येत आहे.

२०. पोस्ट ग्रॅज्युएट च्या विद्यार्थ्यांच्या फी प्रतिपुर्तीचा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे सादर करण्याचे प्रस्तावित आहे.

२१. जमिनीचा एफएसआय वाढविण्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल.

२२. व्हिजीटिंग प्राध्यापकाबाबतचा प्रस्ताव सादर केल्यास तंत्र शिक्षण संचालनालयाकडून अभिप्राय घेण्यात येतील व त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२३. युनिव्हर्सिटीकडून कायम संलग्नता मिळण्यास उशिर होणार नाही याबाबत उचित निर्देश संबंधित विभागामार्फत देण्यात येतील.

२४. बी.एड च्या ४० टक्के रिकाम्या जागा बाबत शासनाने डबल सीईटी घेतली नाही तर असोसिएशन सीईटी घेऊ शकत असेल तर त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

२५. विद्यार्थ्यास वेळेवर जात वैधता प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतात त्यामुळे इयत्ता ९ वी पासून जात पडताळणी प्रक्रिया सुरु करण्यात यावी, या सूचनेचा विचार करुन संबंधित विभागांशी लवकरच चर्चा करण्यात येईल.

२६. शिक्षणामध्ये आय.सी.टी. चा वापर वाढवावा. व्हर्चूअल क्लासरुम/डिटीईचा डेटा इम्पोंट/एक्सपोर्ट करण्याकरीता देखील आय.सी.टी. चा वापर करावा.

२७. पहिली ते आठवी पर्यंतच्या वर्गांना पूर्वीप्रमाणे परीक्षापध्दती लागू करण्याबाबत संस्थाचालकांच्या भावना विचारात घेऊन संबंधित विभागाला कळविण्यात येईल.

२८. एमएसबीटीईचे दोन विभागीय कार्यालये स्थापित करण्याबाबत गव्हर्निंग कौन्सिलने मंजूरी दिलेली आहे व लवकरच याबाबत निर्णय घेण्यात येईल.

२९. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून प्रत्येक धोरण ठरवावे. १० ते २० टक्के प्रवेश झाले असतील तर अभ्यासक्रम बंद करावा किंवा प्रवेश क्षमता कमी करण्याचा प्रस्ताव संस्थांनी पाठवावा व एआयसीटीईने याविषयी सकारात्मक निर्णय घेऊन प्रवेश क्षमता कमी करणे किंवा वाढविणे याविषयी लवचिक धोरण अवलंबावे असे मत व्यक्त केले.

३०. एआयसीटीई कडून एम.ई. कोर्सला परवानगी प्राप्त झाल्यानंतर UGC च्या पत्रानुसार शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हे महाविद्यालयांना सलग्नता देत नाही, याबाबत शिवाजी विद्यापीठातील कुलगुरुंशी चर्चा करण्यात येईल.तसेच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने काही पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास संलग्नता दिलेली नाही याबाबत न्यायालयात याचिका दाखल असल्याने याबाबत न्यायालयाच्या आदेशानुसार निर्णय घेण्यात येईल.

३१. एमसीए अभ्यासक्रम एकाच विद्याशाखेच्या कक्षेत आणि अभ्यासक्रमाचा कालावधी निश्चित करण्यासाठी Joint Board of Vice Chancellor या कौन्सिलमध्ये या विषयावर निर्णय घेण्यास सूचित करण्यात येईल.

३२. तंत्रज्ञान विद्यापीठ अस्तित्वात येण्यासाठी पुन्हा मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

३३. राज्यातील प्रत्येक सहसंचालक कार्यालयात एक विस्तारीत केंद्र करण्याची सध्या आवश्यकता वाटत नाही.

३४. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळामध्ये मागासवर्गीय कक्षाची स्थापना करण्याबाबत आवश्यकता तपासून त्यानुसार मंडळाच्या स्तरावर कार्यवाही करावी

३५. एमबीए अभ्यासक्रमाची सीईटी बरोबर जीडीपीआय घेण्याबाबत तज्ञ समिती नियुक्त करून त्यांच्या अहवालानंतर योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

३६. स्कूल बस व कॉलेज बस च्या आरटीओ शुल्कासंदर्भाने सवलत मिळण्यासाठी असोसिएशनने संबंधित विभागाकडे प्रस्ताव सादर करावा.

३७. शैक्षणिक संस्था करीता विद्युत वितरण कंपनीकडून ऑगस्ट २०१२ पासून वेगळा टेरिफ मंजूर केलेला आहे.

फेडरेशन व इंजिनिअरींग, एमबीए, एमसीए, एचएमसीटी, पॉलीटेक्नीक्स, बीएड इ. असोसिशन यांचे समोरील विविध विषय व तत्संबंधित विविध अपेक्षांवर उपरोक्तप्रमाणे सर्वकष चर्चा झाली. शेवटी डॉ. आर. पी. जोशी उपाध्यक्ष, इंजिनिअरींग असोसिएशन यांनी सर्वांचे मन:पुर्वक आभार मानले व बैठक समाप्त झाली.

-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-